**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्र.०२३४४/२४६१३४ Email-sdojath5@gmail.com

क्र.मा.को.अॅ/रिव्हीजन/१३५/२०२४

दिनांक २४.०२.२०२५

प्रति,

१. आमगोंडा शिवाप्पा कोरे
२. बिराप्पा शिवाप्पा कोरे
३. मलाप्पा शिवाप्पा कोरे
४. शंकर शिवाप्पा कोरे
५. कामु आण्णाप्पा कोरे

सर्व रा.पांडोझरी, ता.जत जि.सांगली --------- **रिव्हीजन अर्जदार**

**विरुध्द**

१. संभाजी तायाप्पा गडदे
२. आकाश मायाप्पा गडदे
३. गंगाराम मायाप्पा गडदे
४. जिजाबाई मायाप्पा गडदे
५. पूनम निलेश मोटे
६. आण्णासाहेब शिवगोंडा गडदे
७. भगवंत रामगोंडा गडदे
८. जयवंत रामगोंडा गडदे

सर्व रा.पांडोझरी, ता.जत जि.सांगली ---------- **जाबदार**

**मामलतदार कोर्ट अॅक्ट-१९०६ चे कलम २३(२)**

**निकालपत्र**

**प्रस्तुत प्रकरणी नमूद रिव्हीजन अर्जाची पार्श्वभूमी थोडक्यात.**

अपर तहसिलदार संख यांनी मामलेदार कोर्ट ऑक्ट १९०६ चे कलम ५ अन्वये क्र.जमिना/रस्ता-०५/ एसआर-११/२०२३, दिनांक १२.०२.२०२४,प्रकरणी दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन, प्रस्तुत रिव्हीजन अर्जदार यांनी या न्यायालयात सदरचा रिव्हीजन अर्ज दाखल केलेला आहे.

**रिव्हीजन अर्जदार यांनी त्यांच्या रिव्हीजन अर्जामध्ये पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले.**

१. अर्जदार यांनी अपर तहसिलदार संख यांचेकडे त्यांचे मौजे पांडोझरी गट नं. ८९/१ मध्ये जाणे येणेसाठी गट नं.९२/२, ८८/२, ८८/३, ९२/३, ८१/३/अ, ८१/१/ब, ९०/१, ९०/३ व ९१/२ जमीनीतुन रस्ता खुला होवून मिळणेकरीता मागणी केली होती. प्रस्तुत जाबदार नं.१ यांच्या गट नं.८९/१ चे अवलोकन केले असता, प्रस्तुत गटामध्ये हणमंत तायाप्पा गडदे, संभाजी तायाप्पा गडदे, रत्नाबाई सतीश काळे, सिध्दाबाई तायाप्पा गडदे मायाप्पा संभु गडदे, मच्छिंद्र शिवाप्पा गडदे, गोरख शिवाप्पा गडदे, कस्तुरी धोंडीराम कळळे, चंद्राबाई अर्जुन सगरे, सोनाबाई दऱ्याप्पा गडदे इतक्या सहहिस्सेदारांची ग.नं.८९/१ च्या ७/१२ सदरी नांवे नमूद असताना केवळ या जाबदार नं.१ यानी अनाधिकाराने प्रस्तुतचा मूळ अर्ज अपर तहसिलदार संख यांचेकडे दाखल केला. प्रस्तुत कामी अपर तहसिलदार संख यांनी प्रथमदर्शनी वाद मिळकतीच्या सहहिस्सेदाराना आवश्यक पक्षकार केल्या शिवाय प्रस्तुत अर्ज दाखल होणेच्या मुद्यावरच फेटाळण्यास पात्र होता.

२. ग.नं.८९/१ च्या इतर सहहिस्सेदारा खेरीज या जाबदार नं.१ यानाच प्रस्तुत रस्त्याची आवश्यकता दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत मूळ अर्जास Non joinder of necessary parties या तत्वाचा बाध येतो.

३. अर्जदार यांच्या जमीनीतुन जाबदार नं. १ यांना जाण्यासाठी कधीही रस्ता नव्हता व नाही. त्यांनी चुकीच्या पध्दतीने अपर तहसिलदार संख यांचे समोर मागणी करुन एकतर्फा मंजुर करुन घेतलेला आहे. दि.०८/०९/२०२३ रोजीचा पंचनाम्याचे अवलोकन केले असता, त्यामध्ये या अर्जदार

यांची राहते घरे असुन त्यांनी त्यांच्या मिळकती मध्ये ऊस व डाळींब अशी पिके लागवडी केली आहेत. त्यामुळे या अर्जदार नं.१ ते ५ यांच्या स.नं.८९/२ व ८९/२ मध्ये रस्ता होता या बाबतचा कोणताही ठोस पुरावा या जाबदार नं.१ यानी दाखल केलेला नव्हता व नाही. अर्जदार यांच्या जमीनीतुन बागायत क्षेत्रातुन मोठ मोठी आंबा, चिंच व कडुलिंब यांची झाडे आहेत. तसेच स.नं.९१/१ व ९१/२ मध्ये चालू पाण्याची विहीर असून तेथुन कधीही रस्ता सुरुवाती पासुन शेवटपर्यंत अस्तित्वात नव्हता व नाही.

४. प्रस्तुत कामातील तहसिलदार यांचा पंचनामा पाहता प्रस्तुतचा रस्ता अडविल्या असलेबाबत कोठेही अडथळा दिसुन आला नाही असे स्पष्ट उल्लेख आहे. त्याच प्रमाणे प्रस्तुत पंचनामा हा रस्ता मागणीच्या अनुषंगाने केला असुन तो चालू वहिवाटीचा रस्ता होता याच्या अस्तित्व दर्शविणारा नसल्याने सदरचा मूळ रस्ता मागणीचा अर्ज बेकायदेशीर असुन तो रद्द होणेस पात्र आहे.

५. प्रस्तुत अपर तहसिलदार संख यांनी मूळ जाबदार यांचे म्हणणे न घेता निकालपत्रात मुद्दे निहाय निष्कर्ष हे चुकीच्या पध्दतीने काढुन आदेश पारीत केलेला आहे तो कायद्यास अनुसरुन नाही.

६. जाबदार नं.१ यांची मिळकत ही पूर्व पश्चिम चालीचा असुन त्यांची जमीन स.नं.८९/१ च्या पश्चिमबाजुस चालू वहिवाटीचा रस्ता अस्तित्वात आहे. प्रस्तुतचा रस्ता हा त्यांच्या जमीनीच्या दक्षिण बाजुस २०० फुट अंतरावर असणाऱ्या मोटेवाडी ते पांडोझरी मुख्य रस्त्यास जावुन मिळतो. अशी वस्तुस्थिती असताना केवळ या अर्जदार नं.१ते ५ यांच्या बागायत जमीनीचे नुकसान करण्याच्या दुष्टहेतुने चुकीच्या पध्दतीने अपर तहसिलदारसो संख यांचेकडे अर्ज दाखल करुन आदेश प्राप्त करुन घेतले आहेत. सदरचा मूळ अर्ज पाहता त्यामध्ये १२ लोकांना जाबदार केले आहेत. दि.०८/०९/२०२३ च्या स्थळपाहणी पंचनाम्या वेळी फक्त दोन लोक हजर होते. त्या अनुषंगाने रोजनामा पाहता कामु आण्णाप्पा कोरे म्हणुन संबंधित व्यक्तीची सही केल्याचे दिसून येते परंतु प्रस्तुत कामु आण्णाप्पा कोरे हे इसम अशिक्षित असुन आंगठाबहाद्दर ते कधीही इंग्रजी मधुन सही करीत नाहीत. त्याच प्रमाणे बिराप्पा आण्णाप्पा कोरे म्हणुन एक इसमांचा आंगठा घेतलेचा दिसून येतो. परंतु सबंध पांडोझरी गांवा मध्ये बिराप्पा आण्णाप्पा कोरे या नांवाची नव्हती व नाही. यावरुनही स्थळपाहणी पंचनामा सदोष व चुकीच्या पध्दतीने केलेला असून त्या पंचनाम्याच्या आधारे दिलेला निकाल हा कायदयाच्या कक्षेत नसलेने तो रद्द होणेस पात्र आहे.

७. मूळ अर्जा मध्ये त्यांनी नमूद केलेले कारण हे चुकीचे असून त्या अनुषंगाने कोणताही कागदोपत्री पुरावा व हातनकाशा या बाबत कोणताही मजकूर अर्जा मध्ये नसल्याने तो प्रथमदर्शनी रद्द होणेस पात्र आहे. केवळ राजकीय द्वेषापोटी या अर्जदार यांच्या स.नं.९१/१ व ९१/२ च्या मिळकतीतुन रस्ता करणेच्या दुष्टउद्देशाने प्रस्तुतचा अर्ज अपर तहसिलदारसो संख यांचेकडे दाखल केला होता. प्रस्तुत रस्त्याच्या अनुषंगाने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, ७/१२ सदरी इतर सहहिस्सेदार असताना केवळ स.नं.८९/१ मधील संभाजी तायाप्पा गडदे यांनी बनावट अर्ज दाखल करुन एकतर्फा आदेश प्राप्त करुन घेतलेला आहे. त्यामुळे तो आदेश रद्द होणेस पात्र आहे.

**जाबदार यांना** प्रस्तुत **रिव्हीजनकामी नोटीस बजाऊन म्हणणे मांडणेची संधी देऊनही प्रकरणी कोणतेही म्हणणे** प्रकरणी सामील **केलेले नाही.**

**रिव्हीजन** अर्जदार यांचा **रिव्हीजन अर्ज, तहसिलदार जत यांचा आदेश, पंचनामा, व प्रकरणी उपलब्ध कागदपत्र** यांचे **एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. अपर तहसिलदार संख यांनी मामलेदार कोर्ट ऑक्ट १९०६ चे कलम ५ अन्वये क्र.जमिना/रस्ता-०५/ एसआर-११/२०२३, दिनांक १२.०२.२०२४,प्रकरणी दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन, प्रस्तुत रिव्हीजन अर्जदार यांनी या न्यायालयात सदरचा रिव्हीजन अर्ज दाखल केलेला आहे.

२. अपर तहसिलदार संख यांचे कोर्टात जाबदार यांनी रस्ता खुला होवून मिळणेकामी अर्ज केलेला होता. अपर तहसिलदार संख यांनी मौजे पांडोझरी ता.जत येथील स.नं ८१/३/अ, १२७/१/क, ८८/२, ९२/२ चे प्रतिवादी कब्जेवहिवाटदार यांनी सदर स.नं.चे पुर्व सरबांधालगत असणा-या दक्षिण उत्तर वहिवाटीचा रस्ता तसेच स.नं.९१/ब, ९०/१, ९०/३ चे पश्चिम सरबांधालगत असणारा दक्षिण उत्तर वहिवाटीचा रस्ता व स.नं. १२७/१/ब चे उत्तर सरबांधालगत असणारा पुर्व पश्चिम वहिवाटीच्या रस्त्यास वादी यांचे स.नं. ८९/१ पर्यज जाणे येणेसाठी सदर रस्त्यांस अडथळा अथवा मज्जाव करू नये. स.नं.९१/१, ९१/२ चे प्रतिवादी कब्जेवहिवाटदार यांनी सदर वहिवाटीचा रस्ता अडथळा न करता पुर्ववत ठेवणेबाबतचा आदेश केलेला आहे.

३. अपर तहसिलदार संख यांचा पंचनामा, आदेश व अर्जदार यांचा अर्ज पाहता वादकारण केव्हा घडले याबाबत निश्चिती होत नाही. त्यामुळे मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ चे कलम प्रमाणे ०५ मूळ अर्ज हा वाद कारण घडलेपासून ६ महिनेच्या आत दाखल केला किंवा कसे याची सुनिश्चिती करणे आवश्यक आहे. तसेच अपर तहसिलदार संख यांनी दिनांक ०८.०९.२०२३ रोजी केलेला पंचनामा पाहता अडथळा केलेला नसलेचे नमूद आहे. जाबदार यांचा वहिवाटीचा रस्ता खुला करणेबाबतच्या अर्जामधील अडथळयाचे स्वरूप व प्रत्यक्ष पंचनामा यामध्ये अडथळा केलेला नाही असे नमूद आहे. पंचनामा व अर्जामध्ये तफावत असल्यामुळे प्रकरणी नव्याने फेर-चौकशी होणे क्रमप्राप्त होणार असल्याने अपर तहसिलदार संख यांनी प्रकरणी सर्व हितसंबंधीत यांना नव्याने नोटीसा बजाऊन म्हणणे मांडणेची संधी देऊन, स्थळपहाणी करून विहीत प्रक्रियेअंती निर्णय घेणे क्रमप्राप्त होणार आहे. प्रकरणी अपर तहसिलदार संख यांनी निकालपत्रातील मुद्दयांच्या अनुषंगाने फेरचौकशीअंती निर्णय घेणे आवश्यक असलेबाबतचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अर्जदार यांचा रिव्हीजन अर्ज अंशतःमान्य करण्यात येत आहे. अपर तहसिलदार संख यांचेकडील आदेश क्र.जमिन/रस्ता/एसआर/०७/२०२३, दिनांक ०६.१०.२०२३, हा निकालपत्रात नमूद कारणास्तव रद्द करण्यात येत आहे. तसेच निकालपत्रात नमूद केलेल्या मुद्यांचे अनुषंगाने फेरचौकशी करून नव्याने आदेश पारीत करण्याकामी प्रकरण पुन्हा अपर तहसिलदार संख यांचेकडे पाठविणेत येत. त्यांनी २ महिन्यात या प्रकरणी नव्याने आदेश पारीत करावेत.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे )

**उपविभागीय अधिकारी**

**जत उपविभाग जत**

**ठिकाणी-जत**

**दिनांक- २४.०२.२०२४**

**प्रत- अपर तहसिलदार संख यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**